Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2023

ISSUE No- (CCCXCV) 395

## WOMEN'S CONTRIBUTION TO MODERN INDIAN SOCIETY



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive-Editors**
Dr. Umakant Chanshetti
Principal,
Jawahar Arts, Science and
Commerce College, Anadur.
Dist. Usmanabad

**Editor**
Dr. Veerbhadarshwar S. Swami
Department of Sociology
Jawahar Arts, Science and
Commerce College, Anadur.
Dist. Usmanabad

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Women herself is a Caste with reference to Selected poems of HiraBansode **Dr. Anita Mudkanna** | 1 |
| 2 | Empowerment of Women through Science Education: Women Scientists in India **Dr. Umakant Chanshetti , Ms. Sangita Shah-Chanshetti** | 3 |
| 3 | An Exploration of Female Characters in Sudha Murty's Dollar Bahu **Dr. Manasi G. Swami** | 9 |
| 4 | A Feminist Approach in MrinalPande'sDaughter's Daughter **Mr. Suresh R. Yadav** | 11 |
| 5 | Effect Of Cyber Crimes On Women: A Premilinary Study **Prof. Dr. Kulkarni Jayashri Ramesh** | 13 |
| 6 | Rainfall Trend In Osmanabad (Marathwada) And Satara(W. Maharashtra) districts Of Maharashtra: A Comparative Study **Dr.Maruti Trimbak Msande** | 17 |
| 7 | Women entrepreneurship in india **Dr. S. G. Birajdar ,Dr. R.V. Varshetti** | 22 |
| 8 | Elimination of violence against women in modern society **Irshad Ahmed , Arshiya Khan** | 26 |
| 9 | Contribution of women in bank and industrial sector **Prof. Ranjana V. Bansude** | 30 |
| 10 | नारी सशक्तिकरण मे हिन्दी साहित्य की भूमिका प्रा.डॉ.दळवे सूर्यकांत माधवराव | 34 |
| 11 | महिला सवलीकरण आणी भारत. डॉ.सय्यद आर.आर. | 36 |
| 12 | भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या समस्या एक सामाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ : उस्मानाबाद व बीड जिल्हा प्रा.अशोक रामचंद्र गोरे | 40 |
| 13 | पंचायत राजव्यवस्था आणि स्त्रिया प्रा.दिनकर सुदामराव रासवे | 43 |
| 14 | शासकीय योजनांच्या माध्यमातून साकार झालेले महिला सबलीकरण **डॉ.बी.डी. पवार** | 46 |
| 15 | गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग: एक स्त्रियांची आरोग्य विषयक समस्या डॉ. अनिल म्हाळाप्पा गाडेकर | 50 |
| 16 | दलित चळवळीतील स्त्रिया प्रा. डॉ. सुनिल रजपूत | 56 |
| 17 | हिंदी साहीत्य मे महारास्ट्र के नारी साहित्यकरो का योगदान" डॉ.शुशीला कपुर क्रत - कमाई किसकी येकाकी नाटक के विशेष सधर्भ मे डॉ. पंडित गायकवाड | 59 |
| 18 | स्त्रीवादआणि स्त्रीवादाचे विविध प्रवाह डॉ. निलेश गोकुळ शेरे | 62 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCXCV) 395
ISSN : 2278-9308
March , 2023

# भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या समस्या एक सामाजशास्त्रीय अभ्यास
## विशेष संदर्भ : उस्मानाबाद व बीड जिल्हा

प्रा.अशोक रामचंद्र गोरे
समाजशास्त्र विभागप्रमुख व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना :—**

भारत हा ग्रामीण समुदायांचा देश समजला जातोत्र भारतात आजघडीला खेड्यांची संख्या जवळपास ६४९४८१ (सहा लाख एकोणपन्नास हजार चारशे एक्याऐंशी) एवढी आहे. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या घटकांमध्ये शेतकरी, बलुतेदार, अल्पभूधारक शेतमजूर, भूमिहीन शेतमजूर आणि शेतमजूर स्त्रिया यांचा समावेश आहे. अनियोजित स्वरूपाची वस्ती, जमीनीबाबत भावनिक संबंध, पारंपारिक शेती, कुटुंबांचे विशेष महत्त्व, सण—समारंभ, जाती—व्यवस्था, शिक्षणाचे कमी प्रमाण, दारिद्र्य, गरीबी, असमानता, अंधश्रध्दा तसेच अनौपचारिक स्वरुपाचे संबंध ते भारतीय ग्रामीण समुदायांचे वैशिष्ट्य आहे.

ग्रामीण पुरूषप्रधान कुटुंब व्यवस्थेत स्त्रियांचा दर्जा निम्नं दिसून येतो. कुटुंबाच्या महत्त्वाच्या निर्णयात स्त्रियांचा सहभाग अत्यंत अल्प किंवा अपवादात्मक दिसून येतो. आधुनिक वर्तमान परिस्थितीत देखील ग्रामीण स्त्रियांची स्थिती अत्यंत प्रतिकूल स्वरूपाची दिसून येते. भारतीय ग्रामीण स्त्रिया वंचित किंवा उपेक्षीत वर्गात मोडतात. साहजिक येथील स्त्रियांच्या अनेक समस्या दिसून येतात. उदा— मुलीच्या जन्मास नकार, हुंडापध्दती, असमानता, शोषण, कुपोषण, मानसिक कोंडमारा इत्यादी.

भारतातील ग्रामीण समुदायात दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांमध्ये भूमिहीन शेतमजूरांची संख्या मोठी आहे. भूमिहीन शेतमजूरांना उपलब्ध होणारा रोजगार हा हंगामी स्वरूपाचा असतो. परिणामी अर्ध बेरोजगारीतून येणारे दारिद्र्य ही या वर्गाची मोठी आणि गंभीर समस्या आहे. रॉयल कमिशनच्या मते हा वर्ग वर्षातील ४—५ महिने तरी बेकार असतो. २०११ च्या जनगणना अध्ययनानुसार ग्रामीण लोकसंख्येतील शेतमजूरांचे प्रमाण ५४.९ टक्के एवढे आहे. एकूण शेतमजूरांपैकी ७५ टक्के शेतमजूर हे मागास प्रवर्गातील आहेत. मराठवाडा आणि विशेषत: बीड जिल्हा हा उसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. यामध्ये पुरूष मजुरांबरोबरच स्त्री मजुरांचा देखील समावेश होता.

**उस्मानाबाद जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती :—**

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील उस्मानाबाद हा एक वैशिष्ट्यपूर्ण जिल्हा आहे. उस्मानाबादचे मूळ नाव धाराशिव आहे. राष्ट्रकुटांच्या राज्यव्यवस्थेत दानपत्रामध्ये या परिसराचे नाव धाराशिव असल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरणा नदीच्या खोऱ्यात अश्मयुगीन मानवी संस्कृतीचे अवशेष आढळून आले आहेत. उस्मानाबाद जिल्हा परिसरावर बौध्द, महानुभाव, जैन, हिंदू आणि इस्लाम संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो.

१६ ऑगस्ट १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होवून लातूर हा नविन जिल्हा उदयास आला. उस्मानाबाद जिल्ह्याच्या आग्नेय दिशेला कर्नाटक राज्य आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ७,५६९ चौरस किमी एवढे आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकुण भूभागापैकी २.३ टक्के भूभाग उस्मानाबाद जिल्ह्याने व्यापलेला आहे. उस्मानाबाद जिल्हा हा बालाघाट पठारांचा प्रदेश, सीना नदीच्या खोऱ्यांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. २०११ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्या १६,५७,५७६ एवढी असून ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ८३.४ टक्के एवढे आहे.

**बीड जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती :—**

साधारणत: महाराष्ट्रातील मध्यवर्ती भागात वसलेला बीड हा वैशिष्ट्यपूर्ण जिल्हा आहे. बीड जिल्हा पूर्वी चंपावतीनगर नावाने ओळखला जात होता. १८६३ साली बीड जिल्ह्याची औपचारिक

घोषणा झाली. बीड जिल्हा हा मराठवाडा विभागाच्या पश्चिमेला वसलेला जिल्हा आहे. गोदावरी ही या जिल्ह्यातील महत्त्वाची नदी आहे. बीड जिल्ह्याला औरंबाद, जालना, परभणी, अहमदनगर, उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्याच्या सीमा आहेत. बीड जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १०,६९३ चौ.कि.मी. एवढे आहे. महाराष्ट्रातील एकूण भूभागापैकी ३.४७ टक्के भूभाग बीड जिल्ह्याने व्यापला आहे. गोदावरी, मांजरा, सीना, बिंदुसरा आणि सिंदफणा ह्या येथील प्रमुख नद्या आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५,८५,९६२ एवढी आहे. बीड जिल्ह्यात एकूण १३६८ खेडी आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ८०.१० टक्के एवढे आहे.

**शोधनिबंधाचे शीर्षक :—**

भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या समस्या एक समाजशास्त्रीय अभ्यास
विशेष संदर्भ : उस्मानाबाद व बीड जिल्हा

**शोधनिबंधाची वैशिष्ट्ये :—**

१) भूमिहीन शेतमजूर स्त्रियांची सद्य:स्थिती जाणून घेणे.
२) उस्मानाबाद व बीड जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती.
३) भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास.
४) भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास.
५) भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास.
६) भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास.

**शोधनिबंधाची गृहितके :—**

१) उस्मानाबाद व बीड जिल्हा तुलनेने मागास आहे.
२) उस्मानाबाद व बीड जिल्ह्यात शेतमजूर स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.
३) बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतमजूर स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे.
४) भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या अनेक गंभीर स्वरूपाच्या आहेत.

**शोधनिबंधाच्या मर्यादा :—**

प्रस्तुत शोधनिबंध हा बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर स्त्रियांपुरता मर्यादीत आहे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोधनिबंध प्रत्यक्ष संशोधनावर आधारित असून तथ्यसंकलनासाठी मुलाखत अनुसूचिचा वापर करण्यात आला आहे. तसेच दुय्यम साधनांचा आधार घेतला असून त्यांसाठी संदर्भग्रंथ, शासकीय अहवाल इ. साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय विश्लेषण :—**

उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यात भूमिहीन शेतमजूर स्त्रियांचे प्रमाण लक्षणीय आहे. भूमिहीन शेतमजूर स्त्रिया वंचित किंवा उपेक्षित गटात मोडतात. शिक्षणाचे विशेषत: उच्चशिक्षणाचे अल्प प्रमाण असल्यामुळे अशा स्त्रियांच्या अनेकविध समस्या दिसून येतात. असंघटित कामगार श्रेणीत ह्या स्त्रिया येत असल्यामुळे आर्थिक असुरक्षिततेचा सामना ह्या स्त्रियांना करावा लागतो. अतिश्रम, दारिद्र्य, सकस आहाराचा अभाव, मानसिक त्रास या सारख्या घटकांमुळे अशा स्त्रिया अनेक समस्यांनी त्रस्त आहेत. समस्याचे प्रामुख्याने तीन प्रकारात वर्गीकरण केले जावू शकते.

**१) आर्थिक समस्या :—** भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या कुटुंबात कमावत्या व्यक्ती कमी आणि अवलंबित व्यक्तींची संख्या जास्त असल्यामुळे आर्थिक विवंचना किंवा समस्या अधिक प्रमाणात दिसून येतात. अशा कुटुंबांचे सरासरी वार्षिक उत्पन्न ५०,००० ते १,००,००० दरम्यान आहे. कुटुंबाच्या उपभोगावर होणाऱ्या खर्चापेक्षा आजारपण, कर्जबाजारीपणा आणि व्यसनांवर होणारा खर्च जास्त आहे. अर्थ बेरोजगारी, सावकारी कर्ज या सारख्या आर्थिक दुष्टचक्रात ह्या स्त्रिया सापडलेल्या दिसून येतात.

**२) कौटुंबिक समस्या :—** भूमिहीन शेतमजूर स्त्रियांचा कुटुंबातील दर्जा हा सामान्य किंवा निम्न स्वरूपाचा आहे. कुटुंबप्रमुख सहसा पुरूश आहेत. कुटुंबातील सर्व प्रकारचे निर्णय कुटुंबप्रमुख या नात्याने पुरूष घेतात. कुटुंबातील निर्णय आणि अंमलबजावणीमध्ये स्त्रियांचा सहभाग अल्प

प्रमाणात दिसून येतो. मुलाच्या जन्माची अपेक्षा असल्यामुळे अशा कुटुंबात जास्त अपत्यांना जन्म दिला जातो. कुटुंबाच्या मालकीचे घर असले तरी ते कच्च्या स्वरूपाचे आहे. असे घर शक्यतो एक किंवा दोन खोल्यांचे आहे. घरात शौचालय असले तरी त्याचा वापर नियमितपणे होत नाही. कुटुंबातील पुरूषांना एकापेक्षा जास्त व्यसन दिसून येते. व्यसनामुळे कुटुंबात भांडण, तंटे नेहमीच होतात. कुटुंबातील स्त्रियांना अपमानास्पद वागणुकीला सामोरे जावे लागते. अशी कुटुंबे मोठ्या प्रमाणात शहरात स्थलांतरीत होत आहेत.

३) आरोग्य विषयक समस्या : — भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्या दिसून येतात. अधिक श्रम, अपुरी झोप, मानसिक कोंडमारा, सकस आहाराचा अभाव, अज्ञान, अंधश्रध्दा, आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष, उपवास, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभावा यामुळे अशा स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या निर्माण होतात. थकवा, सांधेदुखी, पोटदुखी, पाठदुखी, कंबरदुखी यासारख्या समस्या दिसून येतात. आजारपण अंगावर काढणे, आजाराकडे होणारे दुर्लक्ष, लसीकरणाचा अभाव, घरापासून दवाखाण्याचे जास्त अंतर यामुळे आरोग्य विषयक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

निष्कर्ष :—

१) उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यात भुमिहीन शेतमजूर स्त्रियांची संख्या मोठी आहे.
२) भूमिहीन शेमजूर स्त्रियांना अर्थबेकारी, दारिद्र्य या समस्यांना समोरे जावे लागते.
३) सावकारी कर्ज ही मोठी समस्या दिसून येते.
४) शिक्षणाच्या अभावामुळे सावकारी कर्जाच्या दुष्टचक्रात ह्या स्त्रिया सापडलेल्या दिसून येतात.
५) आर्थिक, कौटुंबिक व आरोग्यविषयक अनेक समस्या दिसून येतात.
६) शासकीय योजनांचा फारसा लाभ घेता येत नाही.

संदर्भ सूचि :—

१ए आत्रे त्रि.ना., (डिसेंबर २०१२), गावगाडा, समन्वय प्रकाशन, कोल्हापूर
२ए सहारे पद्माकर, जून २०१५, भारतीय समाजविषयक दृष्टिकोन, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
३ए खरे नेहा, दै.लोकसत्ता, चतुरंग, ८ एप्रिल २०१९
४ए जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २०१७,. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, बीड